आर.जे.ई. क्र.१/२०१८
रूपाली व इतर वि. निरंक

***<u>निशानी क्रं. १ वरील आदेशकिरकोळ दिवाणी अर्ज</u>***
***<u>(न्यायिक चौकशी ) क्रं.०१/२०१८</u>***

प्रस्तूतचा अर्ज अर्जदाराने मयत संतोष माधव गोणेवार यांचे वारस असल्या बाबतचे प्रमाणपत्र मिळणे कामी मुंबई नियमन कायदा १९२७ चे कलम २ व ३ प्रमाणे दाखल करून अर्जदाराचे नांवे वारस प्रमाणपत्र मिळावे म्हणून विनंती केली आहे.

२. अर्जदार यांने त्यांच्या अर्जात असे कथन केले आहे की, अर्जदार क्रमांक १या मयत संतोष माधव गोणेवार यांची पत्नी असून अर्जदार क्रं. २ हा त्यांचा मुलगा आहे. अर्जदाराचे कथनानुसार संतोष माधव गोणेवार हे दिनांक २२/०३/२०१४ रोजी मयत झाले आहेत व अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस आहेत. मयत संतोष माधव गोणेवार हे त्यांच्या हायातीत शिक्षक म्हणून पंचायत समिती हिमायतनगर अंतर्गत शासकीय सेवेत होते. अर्जदाराना कायदेशीर वारस म्हणून त्यांचे सेवा विषयक संदर्भात मिळणारे शासकीय सवलती व योजनाचा लाभ घेण्याकरिता वारस प्रमाणपत्र आवश्यक आहे.

३. अर्जदारांनी त्यांचे कथानकाचे पुष्ठयर्थ अर्जदार क्रमांक १ यांचा पुरावा दिला आहे. पुराव्या मध्ये त्यांनी अर्जदार क्रमांक १ ते २ हे मयत संतोष माधव गोणेवार यांचे पत्नी व मुलगा असल्याचे कथन करून तेच मयत संतोष माधव गोणेवार यांचे वारस असल्याचे शपथेवर कथन केले आहे.

४. प्रस्तूत प्रकरणात निशाणी क्रमांक १ वर पारित आदेशानुसार “दैनिक गोदातीर समाचार ” या वर्तमान पत्रामध्ये दिनांक ११/०२/२०१८ रोजी सदरील वारस प्रमाणपत्रा बाबत जाहिर आक्षेप मागविण्यात आले, परंतू अदयाप पर्यत न्यायालयास कुठलाही आक्षेप प्राप्त झालेला नाही.

५. अर्जदाराने अर्जाचे पुष्ठयर्थ संतोष माधव गोणेवार यांचे मृत्यु प्रमाणपत्र, नगराध्यक्ष ,हिमायतनगर यांनी निर्गमीत केलेले वारसाप्रमाणपत्र ,अभिलेखावर निशाणी ५ वर दाखल कागदपत्राचे यादी अन्वये दाखल केलेल्या आहेत.

६. एकंदरीत अर्जदाराचे कथन, त्यांनी दिलेला पुरावा व दाखल केलेली

कागदपत्रे या वरून असे दिसून येते की, अर्जदार क्रं. १ ते २ हे पत्नी व मुलगा या नात्याने मयत संतोष माधव गोणेवार यांचे कायदेशीर वारस आहेत त्यामुळे त्यांच्या नांवे वारस प्रमाण पत्र देण्यास कुठलीही अडचण दिसून येत नाही सबब खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो.

## आ दे श

१. अर्जदाराचा अर्ज मंजूर करण्यात येतो व अर्जदार क्रं. १ ते २ हे मयत संतोष माधव गोणेवार यांचे वारस असल्याचे घोषीत करण्यात येते.

२. अर्जदारानी वारसाचे प्रमाणपत्रासाठी आवश्यक ते न्यायालयीन शुल्क जमा केल्यानंतर अर्जदार क्रमांक १ ते २ यांच्या नांवे वारसाप्रमाणपत्र निर्गमित करण्यात यावे.

(पंकज आर. फुलारी )

दिनांक : —०५/०३/२०१८ दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, हिमायतनगर